# श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

(रजि. क्र. ए.-७०८ / पुणे)

श्री क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

जावक क्र. ३०३/२०२३ दिनांक : २८/१०/२०२३

## जाहीर निविदा

श्री खंडोबा देवाचा सोमवती उत्सव सोहळा सोमवार, दिनांक १३/११/२०२३ रोजी श्री क्षेत्र जेजुरी येथे साजरा होत असून, त्यानिमित्त येणारे भाविक-भक्त, खांदेकरी, मानकरी ग्रामस्थांच्या सोई-सुविधेसाठी खालीलप्रमाणे जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत :-

(१) ग्रामदेवी जानाई मंदिराबाहेर साधारण २५ X २० आकाराचा व रेल्वे गेटशेजारी अल्पोपहार या ठिकाणी २० X ३० आकाराचा मंडप व्यवस्था करणे.

(२) जेजुरी (छत्रपती शिवाजी महाराज चौक) ते धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) ते कऱ्हा नदी तीरापर्यंत पालखी सोहळा मार्गावरील रस्त्याची साफसफाई व दुरुस्ती करणे.

(३) धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) ते विद्यानगर व्हाया कोरपड मळा पालखी सोहळा मार्गावरील रस्त्याची साफसफाई व दुरुस्ती करणे.

(४) पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना ३०० नग गांधी टोपी व ६०० जोडी सुती पायमोजे पुरविणे.

(५) पालखी सोहळ्यापुढे सहभागी झालेल्या भाविक, खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) शेजारी चहापान, अल्पोपहार व्यवस्था (पुरी-भाजी) साधारण ४००० प्लेट व पिण्याच्या पाण्याची २०० ML बाटलीची व्यवस्था करणे.

(६) श्री खंडोबा मंदिर गडकोटावर २०० / ५०० ML पिण्याच्या पाण्याचे १०० बॉक्सची व्यवस्था करणे.

(७) श्री खंडोबा मंदिर गडकोटावर पालखी सोहळा संपन्न झाल्यानंतर सहभागी असलेल्या भाविक, खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना साधारण ५०० प्लेट भोजनाची व्यवस्था करणे.

(८) पालखी सोहळ्यामध्ये सहभागी भाविकांना सुलभ दर्शन देणेसाठी व गर्दीचे नियोजन करणेकामी २५ सुरक्षारक्षक (कमांडो) पुरविणे.

(९) सालाबादप्रमाणे दिवाळीनिमित्त श्री खंडोबा मुख्य मंदिर, गडकोट सज्जा, नंदी चौक व 'मल्हार' भक्तनिवास येथे विद्युत रोषणाई करणे. (दि. १०/११/२०२३ ते दि. १५/११/२०२३ पर्यंत)

**टीप :- उपरोक्त कामांबाबत देणगीदार असल्यास कृपया श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा. (मो.क्र. - ९७६३०४४०१७ व ९८८१५९७६१८)**

**नियम व अटी :-**

१) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२) निविदा भरणे कामी फॉर्म फी रु. ५००/- जमा करून रीतसर पावती व टेंडरशी संबंधित माहिती देवसंस्थान कार्यालयामधून घ्यावी.

३) इच्छुक टेंडर धारकांनी आपल्या निविदा दि. ०१/११/२०२३ पर्यंत स.९ ते ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

-: निविदा जमा करण्याचे ठिकाण :-

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी.

मल्हार भक्तनिवास (दुर्गामाता चौक) जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

सही/-
**राजेंद्र माणिकराव जगताप**
मुख्याधिकारी
श्री. मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

शिक्का

सही/-
**पोपट सदाशिव खोमणे**
प्रमुख विश्वस्त
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

रविवार । २९ ऑक्टोबर २०२३ । स्थापना वर्ष ८५ वे । मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड,